सोमवार, दि. ०५ डिसेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १३० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282



# संपादकीय पान

## शिल्पकार विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची आज पुण्यतिथी आहे. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लॉंच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन ( चुंबकीय भूमध्य रेखा ) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले. भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लॉंचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ. भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट ) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची ( इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे. डॉ अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रयक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३०डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# निवडणुकीत विजय मिळविण्याकरीत सर्वांना सोबत घेऊन चला - ना. बावणकुळे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगर पालिका निवडणूक -२०२६ मध्ये भारतीय जनता पार्टी ला स्पष्ट बहुमत मिळविण्याकरिता सर्व उमेदवारांनी आपल्या प्रभागातील सर्व घटकाना सोबत घेऊन तसेच केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील फडणवीस सरकार यांनी केलेली कामे मतदारा पर्यंत पोहचून जासित जास्त मतदान भारतीय जनता पार्टीला कसे मिळेल त्याकरिता प्रयत्न करावे व जास्तीत जास्त उमेदवार भाजपाचे निवडून आणावे असे आज भारतीय जनता पार्टी मध्यवर्ती प्रचार कार्यालयाच्या उदघाटन प्रसंगी कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात उमेदवारांना मार्गदर्शनात ते बोलत होते.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री श्री. रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री तथा आ.श्री.बबनराव लोणीकर,आ.श्री.संतोष पाटील दानवे,महानगर पालिका निवडणूक प्रमुख तथा माजी आमदार श्री.कैलाशजी गोरंट्याल,महानगर जिल्हाध्यक्ष श्री.भास्कर आबा दानवे, माजी आमदार श्री.विलास बापू खरात या मान्यवरांसह महानगरातील भाजपाचे सर्व उमेदवार उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना ते म्हणालेकी नुकत्याच झालेल्या नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीमध्ये सर्वात जास्त जागा मिळवून भाजपा हा क्रमांक एकचा चा पक्ष बनला आहे व होत असलेल्या महानगर पालिका निवडणुकीमध्ये सुद्धा क्रमांक एक होण्यासाठी निवडणुकीत उभे असलेल्या सर्व उमेदवारांनी जास्तीत जास्त प्रयत्न करून विजय मिळवावा व जालनां महानगर पालिका भाजपच्या ताब्यात आणावी असे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन झाले यावेळी उमेदवारासह,प्रमुख पदाधिकारी यांच्यासह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# जालना येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगर पालिका निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आज दिनांक ०५ जानेवारी २०२६ रोजी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा डॉ. फ्रेझर बोईज मैदान, जालना येथे सकाळी ११.३० वाजता होणार आहे.

या सभेला भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते व माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर, भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, आ. संतोष पाटील दानवे, महानगर पालिका निवडणूक प्रमुख तथा माजी आमदार कैलासजी गोरंट्याल, भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, माजी आमदार विलास बापू खरात, सतीश घाडगे आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. सभेमध्ये मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस हे जालना महानगर पालिका क्षेत्रातील विकासकामे, आगामी नियोजन, पक्षाची दृष्टी आणि निवडणूक धोरण याबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

तरी सर्व मतदार बंधु-भगिनी, नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टी, जालना महानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## शिवसेनेला मोठे बळ मिळाले असून प्रभाग क्रमांक ४ (ब) मधील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता

**जालना -** या प्रभागातून अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची तयारी करणारे कुणाल योगेश सामलेटी यांनी अंदाज समितीचे प्रमुख तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते व शिवसेनेचे संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत अधिकृतपणे शिवसेना पक्षात प्रवेश केला. या पक्षप्रवेश प्रसंगी शिवसेनेच्या वतीने जालना महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक ४ (ब) मधून नगरसेवक पदासाठी योगेश सामलेटी यांना अधिकृत पुरस्कृत उमेदवार म्हणून जाहीर करण्यात आले. त्यामुळे या प्रभागातील निवडणूक अधिक रंगतदार होण्याची चिन्हे दिसत असून इतर राजकीय पक्षांच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यावेळी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, योगेश सामलेटी यांच्या प्रवेशामुळे शिवसेनेच्या संघटनात्मक बळकटीत मोठी भर पडणार आहे. त्यांचा सामाजिक कार्याचा अनुभव, युवकांशी असलेला घनिष्ठ संपर्क आणि जनतेतील विश्वास हा पक्षासाठी निश्चितच लाभदायक ठरेल. संपर्क प्रमुख भास्करराव अंबेकर यांनीही शिवसेना ही सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणारी संघटना असून, योगेश सामलेटी यांच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक ४ (ब) मध्ये पक्ष अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला.


# पत्रकारिता ही लोकशाहीच्या हिताची तलवार, तर सुरक्षेची ढाल

पत्रकारिता ही कोहीनुरच्या हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षाही तीक्ष्ण धारधार मानल्या जाते आणि आहे सुध्दा. त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते.पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहीत जपण्याचे मोठे माध्यम आहे. महाराष्ट्रात दरवर्षी ६ जानेवारीला पत्रकार दिवस साजरा केला जातो.दिनांक २० फेब्रुवारी १८१२ ला बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म पोंभुर्ले देवगड,तालुका सिंधुदुर्ग येथे झाला व मराठी जगतात लखलखता तारा उदयास आला.मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने ६ जानेवारी १८३२ ला दर्पण नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र जांभेकरांनी सुरू केले या दिनाचे स्मरण सर्वांना रहावे म्हणून ६ जानेवारी दर्पण दिन किंवा पत्रकार दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म या रूपाने सुध्दा ओळखले जाते.जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखाण करने.कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय. जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहिणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी कोणाच्याच लक्षात येणार नाही.त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे.म्हणनूच जांभेकर म्हणतात सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचे कौतुक नव्हे,उलट शिव्या घातल्या तर खऱ्या पत्रकारितेची पावती मीळते असे ते मानीत. भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला चौथास्तंभ ही उपमा दिली आहे. जागतिक हालचाली, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय, राजकीय हालचाली, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण माहिती १४० कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते. प्रत्येक वर्षी ६ जानेवारीला महाराष्ट्रात पत्रकार दिवस साजरा केला जातो. १९२० मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दार्शनिक जॉन डेवी यांनी लोकतांत्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते. पत्रकारिता जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो. प्रत्येक बाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते. पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने, कॅमेरात कैद करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविने. आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन, वेब-पत्रकारिता, मिडिया, फेसबुक, सोशल मीडिया, ई-पत्रकारिता यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वत:च्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते यालाच म्हणतात चौथास्तंभ.पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात पत्रकारितेची शैली. पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून तिक्ष्ण(धारधार) लीखाण केल्या जाते.यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात.पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते.कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर असते व ती लेखणीतून निर्माण होत असते. आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ,ग्रह-तारे, चंद्र-सुर्य, चंद्रयान यातील घडामोडी जनतेला कळुन येतात.आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आपण पहात असतो.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असतो.तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे. आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट व नदीपेक्षा सोज्वळ निर्मळ असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी,तेलगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीस या भाषांचे ज्ञान होते.मराठी व संस्कृतमध्ये निष्णात झाल्याने बाळबोध,गीतपाठ, वेदपठण,अमरकोश,लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा दांडगा अभ्यास होता.१८३२ साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्रहोय.त्यावेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी दर्पणमध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे. यानंतर राजा राममोहन रॉय यांचा संवाद कौमुदी टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' डॉ बाबासाहेब आंबेडकर याचे मुकनायक ही सर्व वृत्तपत्रे आर्थीक तोटा सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविल्या जात होती. पत्रकारीतेतील तीक्ष्ण(धारधार) लेखणीमुळे भारत स्वतंत्र करण्यास मोठी भूमिका होती.त्यामुळे इंग्रजांना भारत सोडून जावे लागले व १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुरदर्शन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता.परंतु सरकारने टिआरपी घोटाळा उघडकीस आणुन पत्रकारिता व चौथास्तंभ यांच्यावर थोडीशीही इजा होऊ दिली नाही.६ जानेवारी पत्रकार दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी व जबाबदारी सर्वांनीच घेण्याची गरज आहे. देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते व समाज निर्माण होतो. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी,वादळ, सुनामी यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो. परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो.अशा असामाजिक तत्वांना केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. ६ जानेवारी पत्रकारिता व दर्पण दिनाला शत-शत प्रणाम.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच महिलांना अधिकारांची जाणीव - अरविंद चव्हाण

राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**जालना । प्रतिनिधी -** महिलांना साक्षर करून त्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून दिल्यामुळे सर्वक्षेत्रात महिलांनी भरारी घेतली आहे, हे महान कार्य क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळे घडून आले आहे, असे प्रतिपादन जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा) पक्षाचे अध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांनी केले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिनानिमित्त जालना जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा) पार्टीकडून शनिवारी रोजी पक्ष कार्यालयामध्ये अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक भाषणातून बोलतांना जालना शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमुद म्हणाले की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाचा पाया रोवून अथक परिश्रमातून रंजल्या गांजल्या समाजाचा उद्धार केला आहे. त्यांचे विचार आज ही प्रेरणादायी आहे.

युवकचे प्रदेश सरचिटणीस धैर्यशील चव्हाण अभिवादन पर बोलतांना म्हणाले की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फ ुले यांनी स्त्री शिक्षणांचा पाया रोवतांना त्यांना प्रस्थापित समाजकडून अनेक यातना सहन कराव्या लागल्या तरी त्या डगमगल्या नाहीत.

याप्रसंगी मिर्झा अन्वर, शिवराज जाधव, संतोष ढेंगळे, प्रताप शिंदे वंदना खाडेभराड, रिंकल तायड, उर्मिला वैष्णव, मीनाताई सुपेकर, बबन गाढेकर, केलास मगरे, गजानन सुपेकर, सराटे, जहीर बिल्डर, जावेद अली, सीताराम तुपे आदी कार्यकर्ते उपस्थित येते. सूत्रसंचालन संतोष ढेंगळे यांनी केले.

### जिल्हा परिषद शाळा माव येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

# शाळेच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांकडून मदतीचा ओघ

**माव । प्रतिनिधी -** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकतेच माजी विद्यार्थ्यांच्या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत गावातील तसेच परतूर येथे स्थायिक झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी शाळेच्या प्रगतीसाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी लोकसहभागातून निधी उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

जुन्या आठवणींना मिळाला उजाळा

या बैठकीच्या निमित्ताने अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. शाळेचे मुख्याध्यापक यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत केले. यावेळी मुख्याध्यापकांनी शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी लोकसहभागाचा निर्धार

आजच्या स्पर्धेच्या युगात जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांप्रमाणे दर्जेदार सुविधा देण्यासाठी लोकसहभाग आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त झाले. शाळेचा भौतिक विकास, ई-लर्निंग साहित्य, साऊंड सिस्टिम, प्रोजेक्टर, क्रीडांगण विकास आणि फर्निचर यांसारख्या गरजा पूर्ण करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेण्याचे ठरवले.

निधीची घोषणा आणि पारदर्शकतेची ग्वाही

बैठकीत उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी तत्काळ आर्थिक मदतीची घोषणा केली. यात प्रामुख्याने:



प्रा. पांडुरंग नवल सर: १०,००० रुपये (५००० रोख व ५००० दोन महिन्यांनी)

बप्पा नवल सर: ५,००० रुपये

राजेश नवल सर: ५,००० रुपये

उत्तम किंगरे सर: ५,००० रुपये

डॉ. अंगद नवल: १,००० रुपये

महेश नवल (पोलीस पाटील): १,००० रुपये

याव्यतिरिक्त इतरही सदस्यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. हा सर्व व्यवहार पारदर्शक राहावा यासाठी फोन-पे किंवा स्कॅनरद्वारे ऑनलाइन पेमेंट स्वीकारले जाणार असून, जमा व खर्चाचा हिशोब ग्रुपवर नियमितपणे मांडला जाईल, असा विश्वास मुख्याध्यापकांनी व्यक्त केला.

उपस्थित मान्यवर

या बैठकीला प्रा. पांडुरंग नवल, बप्पा नवल, उत्तम किंगरे, अंगद नवल, पोलीस पाटील महेश नवल, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष नवल, अंगद बोराडे, राजेभाऊ खालापुरे, समाधान नाईकनवरे, संतोष सोळंके व इतर माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आवाहन:

जे माजी विद्यार्थी नोकरी किंवा व्यवसायानिमित्त बाहेरगावी आहेत, त्यांनीही आपल्या मातृभूमीतील शाळेच्या विकासासाठी सढळ हाताने मदत करावी, असे आवाहन शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

महापालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जालना पोलीस अक्शन मोडवर

## गोतस्करांना तडीपार, एमपीडीएची तंबी; अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांचा इशारा

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे अक्शन मोडवर आले आहे. कायदा व सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाईचा इशारा देत अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी गोतस्करांकडून बंधपत्र लिहून घेत समज दिली आहे. आज पोलीस अधीक्षक कार्यालयात गोतस्करांची ओळख परेड घेण्यात आली. यावेळी पुन्हा गोतस्करी करताना आढळल्यास संबंधितांवर तडीपार अथवा एमपीडीए (चझऊ) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल, असा थेट इशारा अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी दिला. जालन्यात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या गोतस्करीमुळे धार्मिक तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन संभाव्य तणाव टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून गोतस्करांकडून बंधपत्र लिहून घेण्याची मोहीम सुरू केली आहे. दरम्यान, गेल्या एका वर्षात गोतस्करी प्रकरणात तब्बल ६१ गुन्हे दाखल करण्यात आले असून ४७८ गोवंशांची सुटका करण्यात आली आहे. तसेच गोतस्कर व विक्रेते मिळून २०० पेक्षा अधिक गुन्हेगारांकडून बंधपत्र घेण्यात आले आहे. या बंधपत्रांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशाराही अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी दिला आहे. निवडणुकीच्या काळात शांतता व सलोखा कायम राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून, कोणत्याही प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांना खपवून घेतले जाणार नाही, असा संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.







# दर्पण दिन (दि ६ जानेवारी)

## सन्मान पत्रकारितेचा सत्कार • पत्रकारांचा

### ज्येष्ठ पत्रकांराचा सहपरिवार सत्कार

उदयोन्मुख संपादक, जाहीरात प्रतिनिधी यांचा सत्कार

सर्व पत्रकार, छायाचित्रकार, पेपर वाटणारी मुले यांचा सत्कार

## दै. त्रिकाल संघर्षचे लोकार्पण

**स्थळ : भारती लॉन्स, राजुर रोड, जालना**

**मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६, वेळ सकाळी १० वा.**

आयोजक

दीपक शेळके, बाबासाहेब आटोळे, दर्पण सकलेचा, गणेश काबरा,
शेख चांद पी.जे., आमेर खान, सुहास वैद्य, प्रा. दत्ता देशमुख,
शेख अशफाक, बाबुजी तिवारी, शेख चांद पी.जे., बाबासाहेब कोलते,
विष्णु कदम, सुनील भारती, शाहरुख शेख, आशिष तिवारी, प्रदीप देशमुख,
जीवन काळे, माणिक जैस्वाल, योगेश देशमुख, दिनेश नंद,
नरेंद्र जोगड, योगेश काकफळे, सुनील नरवडे, शेख मुजीबुद्दीन,
सलमान सय्यद, निकीता काळे, शेख महेजबीन.

मार्गदर्शक - अंकुशराव देशमुख, विजयकुमार सकलेचा, विनायक दहातोंडे, रवींद्र बांगड, महेश जोशी, लक्ष्मण राऊत, गुलाब पाटील, संजय भरतीया, बद्रीनाथ टेकाळे, भरत मानकर

**पदाधिकारी, सदस्य व सभासद**

**प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र, जालना**

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.